# <u>सरणावरची कविता</u>

देव जेव्हा भेटला मला तेव्हा असे वाटले मला
पृथ्वी वरी होते जरी भार तिचा माथी आला...
सूर्याचा ही गाभा पाहिला पृथ्वीचाही लाव्हा पाहिला
अग्निफुलांच्या चांदण्या माझ्याभोवती नाचू लागल्या...
भीषण होते दृश्य सारे आगीचा तो डोंब सारा
भयावह असले तरी रमणीय भासले मला...
मी जरी बघत होते निरखत होते माझी मला
तरी सुद्धा दिसत नव्हती आरशामध्ये मी मला...
जरा मागे वळून मी जीवन नदीत डोकावले
पाण्यातही दिसत नव्हती मी आता स्वतःला...
कुठे होती मी तेव्हा कशी हरवून बसली मला
आजूबाजूचे सारे जग रडत होते पाहून मला...
अश्रूंच्या त्या गंगा जमुना वाहत होत्या मोठ्या धारा
त्यांच्यातही धमक नव्हती विजवण्याची अग्निज्वाला...
झाली झाली राख झाली माझ्या साऱ्या देहाची
एक एक पेशी माझी अनंतात विलीन झाले...
इथे इथे आता होते इथे इथे माती झाली
आला क्षण गेला क्षण जीवन गती शून्य झाली...
जमलेले सारे आता एक एक विखरत गेले
चालत बोलत तिथे गेले जिथे बाळ रडत होते...
माझा पुन्हा जन्म झाला सारे आता इकडे आले
बारशाच्या गोडा नंतर श्राध्द थाळीने तृप्तावले...